# पालघर जिल्ह्यातील कातकरी ही आदिम जमात तसेच आदिवासी मधील शोषित, वंचित घटक यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणणे

**उद्देश:**

पालघर जिल्ह्यातील कातकरी आदिम जमात व इतर आदिवासी महिला, युवक-युवती यांचे व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी उपक्रम राबविण्या संदर्भात, प्रारुप तयार करून; त्याची अंमलबजावणी केली जाईल.

**उद्दिष्ट:**

- कातकरी समुदायाला रोजगार व स्वयमरोजगार याबाबत कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाईल.
- आदिवासी-कातकरी तरुणांमध्ये उद्योग- व्यवसाय करण्याची क्षमता विकसीत केली जाईल.
- स्पर्धा परीक्षांमध्ये जास्तीत जास्त युवक-युवती यशस्वी व्हावेत म्हणुन त्यांची बौद्धिक व मानसिक क्षमतेत वाढ करण्यासाठी प्रयत्न केले जातील.
- आदिवासी युवक-युवतींसाठी कौशल्यावर आधारित पायाभूत कार्यक्रम आखले जातील.
- आदिवासी युवक-युवती मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान

जसेकी संगणक व मोबाईल प्रशिक्षण देऊन; त्यांच्यामध्ये साक्षरता विकसीत केली जाईल.

**आदिवासी- कातकरी युवक-युवती लाभार्थी निवडीचे निकष:**

- उपक्रमासाठी आदिम जमातीतील तसेच इतर आदिवासी जमातीतील वंचित व शोषित घटकातील वय वर्ष १८ ते ४० पर्यंतच्या युवक-युवतींची निवड केली जाईल.

**उपक्रमाच्या अमलबजावणीसाठी रणनीती आखणे व यंत्रणा विकसित करणे:**

- लोकसहभाग वाढवण्यासाठी वृत्तपत्रे, दृकश्राव्य, डिजिटल व समाज माध्यमांचा प्रभावी वापर केला जाईल.
- कातकरी या आदिम जमातीतील तसेच इतर आदिवासी वंचित घटकातील युवक-युवतींची लाभार्थी म्हणुन निवड केली जाईल.

**योजनेची अंमलबजावणी:**

- या विषयातील तज्ज्ञ व्यक्ति व संघटनेचे विश्वस्त यांच्याशी सल्ला मसलत करून उपक्रमाची अंमलबजावणीचे प्रारुप तयार करण्यात येईल.

**व्याख्याते व वक्ते यांना निमंत्रित करणे:**

- या विषयातील तज्ज्ञ व्यक्ति, प्राध्यापक, अभ्यासक व संशोधक यांना प्रशिक्षण व व्याख्यानासाठी निमंत्रित केले जाईल.

**कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी:**

- या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मदतीने प्रकल्पाचे सनियंत्रण आणि मूल्यांकन केले जाईल.
- वेळोवेळी याबाबतचा प्रगती अहवाल शासनाला सादर केला जाईल.

**अपेक्षित खर्च:** ₹ ५२,४०,०००\-

**उपक्रमाचा कालावधी:** १२ महिने (१ वर्ष)